॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव. दि.१८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त शुक्रवार दि.२१ जून रोजी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे.

२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्यात आला आहे. या दिवशी योग दिन प्रात्यक्षिक घेण्याविषयी मानव संसाधन विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली तसेच उच्च तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार २१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी सकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यापीठ परिसरात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांसाठी पदवीप्रदान सभागृहात योग शिक्षकांकडून प्रात्यक्षिक घेतले जाणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९          दिनांक : १८ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी